अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । बुधवार
३०.०९.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

| वर्ष: ०७ | अंक: २४१ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२ |
|---|---|---|---|

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712


## थोडक्यात

### लालबागच्या राजाच्या प्रसादातून वीज निर्मिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी येणाऱ्या हजारो गणेशभक्तांना उत्सवाच्या काळात वाटप करण्यात आलेल्या प्रसादातून निर्माण झालेल्या ओल्या कचऱ्याचे यंदा थेट ऊर्जेत रूपांतर करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या १० दिवसांच्या कालावधीत निर्माण झालेला सुमारे ४२ मेट्रिक टन कचरा संकलित करण्यात आला. त्यातील ओला व अन्नकचरा महापालिकेच्या जैववायू निर्मिती प्रकल्पांमध्ये प्रक्रिया करून त्यातून जैववायू आणि वीज तयार केली जात आहे. यंदा प्रथमच महापालिकेने लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या सहकार्याने 'प्रसाद टू पॉवर' हा उपक्रम राबविला.

## आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – देशाच्या युवा शक्तीला रोजगारक्षम बनवण्यासाठी शिक्षणासोबत कौशल्य विकास, प्रशिक्षण आणि रोजगार यांची सांगड घालणे आवश्यक आहे. केवळ पदवी मिळवणे पुरे–से नसून बदलत्या तंत्रज्ञानानुसार (एआय, सेमीकंडक्टर, क्वांटम कॉम्प्युटिंग) सातत्याने 'अपस्किलिंग' आणि कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज आहे. जगात २८ हून अधिक देशांमध्ये मनुष्यबळाची मोठी मागणी असून, महाराष्ट्रातील तरुणांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) महिला विद्यापीठ येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने 'पंडित दीनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळाव्याचा कोकण व नाशिक विभागातील सर्व जिल्ह्यात' ऑनलाईन शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडीओ संदेशाव्दारे रोजगार मेळाव्याला शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री यांच्या हस्ते सहीदा परमाणिक यांना क्रेवा कॅपीटल सर्व्हिसेस प्रायवेट लिमीटेड बेलापूर व कांती शंभू चव्हाण यांना क्रेवा कॅपीटल सर्व्हिसेस प्रायवेट लिमीटेड कुर्ला येथील या कपंनीकडून नियुक्तीपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाला कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रो. हेमलता बागला, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.अपूर्वा पालकर आदी उपस्थित होते.

कोकण व नाशिक विभागात ४०० पेक्षा जास्त मेळावे कोकण व नाशिक विभागातील १२ जिल्ह्यांमध्ये रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. आतापर्यंत १५०० पेक्षा अधिक उद्योजक नियोक्त्यांनी आणि एक लाखांपेक्षा अधिक रोजगार इच्छुक युवक–युवतींनी रोजगार महाकुंभासाठी नोंदणी केली आहे. सहभागी उद्योजकांकडून २५,००० पेक्षा अधिक रोजगाराच्या संधी रिक्त पदांची मागणी नोंदवण्यात आली आहे. जिल्हानिहाय शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, स्थानिक प्रशासन व इतर संस्थांच्या समन्वयातून उमेदवार व नियोक्त्यांचे समन्वय करण्यात आले आहे.

## भारताच्या लेकींनी रचला इतिहास! महिला तीरंदाजी संघ अन नीरू-कीननचे सुवर्णपदक

### पीएम नरेंद्र मोदींकडून कौतुक!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई खेळ २०२६ स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी विजयाची मालिका कायम ठेवत देशासाठी ऐतिहासिक सुवर्णपदकांची कमाई केली आहे. ट्रॅप नेमबाजी प्रकारात नीरू धांडा आणि कीनन चेनाई या जोडीने, तर महिलांच्या कंपाऊंड तीरंदाजीसंघाने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या दोन्ही ऐतिहासिक कामगिरीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे विशेष अभिनंदन करत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली आहे.

**तीरंदाजीत चीनचा पराभव करत जागतिक विक्रमाची बरोबरी**

महिलांच्या कंपाऊंड तीरंदाजीच्या अंतिम सामन्यात ज्योती सुरेखा वेन्नम, प्रथिका प्रदीप आणि चिकिथा तनिपार्थी यांच्या भारतीय त्रिकूटाने चीनच्या संघाला २३८–२३४ अशा फरकाने नमवत सुवर्णपदक पटकावले. या विजयादरम्यान भारतीय महिला संघाने २०१४ मध्ये दक्षिण कोरियाने नोंदवलेल्या २३८ गुणांच्या जागतिक विक्रमाची बरोबरी केली. पंतप्रधानांनी या यशाचे कौतुक करताना सोशल मीडियावर लिहिले की, 'जागतिक विक्रमाची बरोबरी करत मिळवलेले हे सुवर्णपदक अत्यंत खास आहे.

आपल्या तीरंदाजांचे हे यश थक्क करणारे असून आगामी वाटचालीसाठी त्यांना खूप खूप शुभेच्छा.' मिश्र ट्रॅप नेमबाजीत भारताचे पहिलेवहिले ऐतिहासिक सुवर्ण नेमबाजीत नीरू धांडा आणि कीनन चेनाई या जोडीने मिश्र ट्रॅप सांघिक प्रकारात सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. आशियाई खेळांच्या इतिहासात या प्रकारात भारताला मिळालेले हे पहिलेच सुवर्ण ठरले आहे.

### काँग्रेस विरोधात भाजप युवा मोर्चाचं अनोखं आंदोलन

## ॲम्बुलन्स, डॉक्टरांच्या ताफ्यासह राहुल गांधींचा पुतळा घेऊन कार्यकर्ते नागपूरच्या मनोरुग्णालयात धडकले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नागपूर** – नागपूरात भारतीय जनता युवा मोर्चाकडून अनोखे आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनात भारतीय जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांकडून राहुल गांधी यांचा पुतळा प्रादेशिक मनोरुग्णालयात उपचारासाठी दाखल करून घ्या, असा आग्रह रुग्णालयाच्या प्रशासनाशी केला आहे आहे.




राहुल गांधी यांचे डोकं जागेवर नाही, ते वारंवार संघावर, पंतप्रधान मोदींवर, निवडणूक आयोगावर आणि भाजपवर बिनबुडाचे आरोप करतात, त्यांना मानसिक उपचाराची गरज असल्याचे आमच्या डॉक्टरांनी सांगितले आहे. त्यामुळे त्यांना उपचारासाठी नागपूरच्या प्रादेशिक मनोरुग्णालयात दाखल केलं जावं, या मागणीसाठी आणि त्यांच्या प्रकृतीच्या काळजीसाठी आम्ही आंदोलन करत असल्याची प्रतिक्रिया भारतीय जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांकडून देण्यात आली आहे.

राहुल गांधींचा प्रतिकात्मक पुतळा नागपूरच्या पागलखाना रुग्णालयात उपचारासाठी आणून आंदोलन एसआयआरच्या मुद्द्यावर राहुल गांधी यांच्या पत्रकार परिषदेतील आरोपानंतर त्यास उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस नेते राहुल गांधींच्या मेंदू चोरीला गेलेलं असल्याचं म्हटल्यानंतर आज युवा मोर्चाच्या कार्यकर्त्याकडून राहुल गांधींचा प्रतिकात्मक पुतळा नागपूरच्या पागलखाना रुग्णालयात उपचारासाठी आणून आंदोलन केले जात आहे.

यावेळी प्रतिकात्मक पुतळा एका ॲम्बुलन्समधून आणला गेलाय. यावेळी भारतीय जनता युवा मोर्चाचे कार्यकर्ते मनोरुग्णालय परिसराच्या आत ॲम्बुलन्समध्ये आणलेल्या पुतळ्यासह दाखल झाले. परिणामी यावेळी काहीसा गोंधळ उडाल्याचे बघायला मिळाले.

काँग्रेस आणि राहुल गांधी व्होट चोरी म्हणत आहेत, मात्र यांचा मेंदू चोरीला गेलेला आहे. मी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विनंती करतो की, एखादी चौकशी समिती तयार करता येईल का, जी यांचा चोरी गेलेला किंवा गहाण ठेवलेला मेंदू परत आणून देईल?

तो त्यांना परत मिळेल, अशी एखादी व्यवस्था करता येईल का? अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधींवर हल्लाबोल करत भाष्य केलं होतं. पुढे बोलताना ते म्हणाले की, , निवडणूक आयोगासारख्या संविधानिक संस्थांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

जनतेचा विश्वास मिळवता येत नसल्यामुळे व्यवस्थेबद्दल अविश्वास निर्माण करण्याची रणनीती आखली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

## ना परीक्षा, ना ट्रेनिंग, कुठलीही अट नाही : अग्निवीरांना पोलिसांच्या पदावर घेणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रातील माजी अग्निवीर यांना शासनाच्या गट–क गणवेशधारी सेवांच्या भरतीत १० टक्के समांतर आरक्षण देण्याचा आणि त्यांना शासकीय व निमशासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी धोरण निश्चित करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

माजी अग्निवीरांसाठी हे कप्पीकृत समांतर आरक्षण राहणार असून, सामाजिक आरक्षण अबाधित ठेवण्याच्या अटीवर आवश्यकतेनुसार आरक्षणाची मर्यादा वाढविण्याचे अधिकार उच्चस्तरीय सचिव समितीस देण्यात आले आहेत. हे आरक्षण महाराष्ट्राचे रहिवासी



असलेल्या माजी अग्निवीरांना लागू राहणार आहे.

पोलीस, कारागृह, नागरी संरक्षण, गृहरक्षक दल, राज्य गुप्तवार्ता विभाग, राज्य उत्पादन शुल्क, वन विभाग तसेच महानगरपालिकांमधील गणवेशधारी गट–क पदांच्या भरतीत माजी अग्निवीरांना संधी देण्यात येणार आहे. संबंधित पदांसाठी लेखी परीक्षेतून पूर्णपणे सूट देण्यात येणार असून, वयोमर्यादा, शारीरिक कार्यक्षमता व शारीरिक मानक चाचणी, ज्येष्ठता, पदोन्नती, प्रशिक्षण तसेच अनुभव व कौशल्यांबाबतच्या सविस्तर तरतुदी शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात येणार आहेत. अग्निवीरांना पूर्णपणे सूट मिळणार– अग्निपथ योजनेंतर्गत चार वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या माजी अग्निवीरांच्या शिस्त, नेतृत्व, तांत्रिक कौशल्य व प्रशिक्षणाचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना राज्याच्या गणवेशधारी सेवांमध्ये संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

अग्निशामक विमोचक, अग्निशामक या पदाकरिंता घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेतून माजी अग्निवीरांना पूर्णपणे सूट मिळणार आहे. वयोमर्यादेत सूट, शारीरिक कार्यक्षमता चाचणी व शारीरिक मानक चाचणी सूट, ज्येष्ठता व पदोन्नती तसेच प्रशिक्षण तसेच अन्य अनुभव, कौशल्ये याबाबत सविस्तर शासन निर्णय काढण्यास मान्यता देण्यात आली.

पोलीस किंवा वेगवेगळी पदे आहेत, त्या पदावर आपण अग्निवीरांना सामावून घेणार आहोत. आपण त्यांना वयातही चार वर्षाची सुट देणार आहोत. विशेष बाब म्हणून कोस्टल सिक्युरिटी म्हणून आपण त्यांना घेणार आहोत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.




# ‘त्या’ तालुक्यांनाही मदत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली ग्वाही

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – पिके करपलेल्या परंतु ट्रिगर-१ च्या पहिल्या निकषांत न बसलेल्या तालुक्यांच्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून त्यांचा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या दुसऱ्या यादीत समावेश केला जाईल. या तालुक्यांना दुष्काळी उपाययोजनांचे लाभ दिले जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली. राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी मंत्रालयात पार पडली. या बैठकीत दुष्काळी तालुक्यांच्या यादीत अनेक तालुक्यांचा समावेश झाला नसल्याचा मुद्दा अनेक मंत्र्यांनी उपस्थित केला. या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळ बैठकीनंतर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी तांत्रिक बाबींमुळे कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होणार नसल्याची ग्वाही दिली.

तालुका नव्हे, तर मंडळ स्तरावर पाहणी विशेष म्हणजे ही पाहणी केवळ तालुका पातळीवर मर्यादित न ठेवता मंडळ स्तरावरही करण्याचा विचार आहे. त्यामुळे एखाद्या तालुक्यातील काही भागात मोठे नुकसान झाले असेल, तर त्या भागातील शेतकऱ्यांची परिस्थिती स्वतंत्रपणे तपासता येणार आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त यादीत नसलेल्या तालुक्यांतील शेतकऱ्यांसाठी सरकारचा हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. जनावरांचा चारा आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन तसेच उभ्या पिकांना पाणी देण्याच्या संदर्भात मंत्रिमंडळाने महत्त्वपूर्ण धोरण निश्चित केले असून, पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी व योग्य वितरणासाठी स्वतंत्र शासन निर्णय जारी केला जात आहे, असेही ते म्हणाले. उपवर्गीकरणावर सर्वसहमती अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाबत नेमलेल्या समितीचा अहवाल आला आहे निर्माण झाले.

# झटामझिरी व खडकाच्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सानुग्रह द्या

## शेतकऱ्यांची आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांचेकडे मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – बळीराजा शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी, झटामझिरी व खडका येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांना मंजूर सानुग्रह अनुदान लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले. सानुग्रह अनुदान मंजूर होऊन जवळपास २ वर्ष होऊन सुद्धा वरुड तालुक्यातील काही गावे वगळता इतर गावांतील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान अद्याप देखील प्राप्त झालेले नाही. यामध्ये खडका व झाटामझिरी बरोबर इतरही गावांचा समावेश होतो.

यावर्षी कोरडा दुष्काळ असल्याने शेतकऱ्यांची व शेतमजुरांची परिस्थिती अत्यंत हलाखीची असतांना आधीच प्रकल्पात ज्यांच्या जमिनी म्हणजे उदरनिर्वाहाचे मुख्य साधन प्रकल्पात गेले आहे, त्या शेतकऱ्यांना जमीन संपादनानंतर मिळणाऱ्या योग्य सानुग्रह मोबदला अद्याप पूर्णपणे मिळालेला नाही. संबंधित प्रशासकीय विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा करून देखील योग्य ती कारवाई झालेली नाही. मोबदला मिळण्यास विलंब होत असल्यामुळे सर्व बाधित शेतकरी व त्यांचे कुटुंब मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले असल्याने आमदारांनी या व्यथा प्रशासनापर्यंत पोहोचवुन १५ दिवसांच्या आत न्याय मिळवुन देण्यात यावा, अशी मागणी केली.

दिलेल्या मुदतीत येणाऱ्या १५ दिवसांत जर सानुग्रह अनुदान बाधित प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मिळाला नाही तर या अनुदानापासून वंचित सर्व बाधित शेतकरी मिळुन जलसमाधी आंदोलन करणार असल्याचा ईशारा बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे कोषाध्यक्ष संजय गीद, जिल्हाध्यक्ष लक्ष्मणराव बोडखे, प्रा.कमलनारायण उईके, सियाले, मोहन बोबडे, अरविंद फुले, यशवंत वाडीवे, विठ्ठल खतरकर, पुरुषोत्तम तिळगाम, अरुण तिळगाम, अनु नागले, वर्षा घाठेक, गिता मालवे, कजला उईके, संगीता कवडेक इत्यादी उपस्थित होते.

## ‘समाजातील महिलांची सुरक्षा व गोपनियता’ विषयावर

# तालुका विधी सेवा समितीच्या वतीने जागरुकता कार्यक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**वरुड** – महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांचे मार्गदर्शनानुसार जागृती योजना-२०२५ अंतर्गत तालुका विधी सेवा समिती, वरुडचे वतीने स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट सायन्स ॲड आर्ट ‘समाजातील महिलांची सुरक्षा व गोपनियता’ या विषयावर जागरुकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये अंदाजे १३५ विद्यार्थिनींनी उपस्थिती राहून कार्यक्रमाचा लाभ घेतला.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते ॲड.प्रणीता चव्हाण आणि ॲड.ए.आर.घाटोळे यांनी विद्यार्थिनींना त्यांची शारिरीक सुरक्षा व डिजीटल गोपनियता याबाबत कशा पध्दतीने सतर्क राहावे व आपली स्वतःची सुरक्षा कश्या पध्दतीने करावी तसेच महिलांची सुरक्षा व गोपनियतेसंबंधाने आपल्या देशात कोणकोणते कायदे अस्तित्वात आहे, याबाबत सविस्तर माहिती देवून मार्गदर्शन केले तर दिवाणी न्यायाधीश व्ही.व्ही.राजुरकर यांनी महिलांची शारीरिक सुरक्षितता, डिजिटल गोपनियता व सुरक्षा, कायदेविषयक अधिकार आणि आणिबाणीच्या काळातील मदत या महत्वपुर्ण मुदयांवर सखोल माहिती दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधीश व्ही.व्ही.राजुरकर होते तर प्रमुख अतिथी म्हणुन तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड.ए.आर.घाटोळे, ॲड.प्रणीता चव्हाण, ॲड.डी.पी.सदापुरे, ॲड.सुजीता मानकर, प्रा.किशोर तडस, प्रा.चेतन गणोरकर तसेच न्यायालयीन कर्मचारी व महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे संचालन प्रा.चेतना सावरकर तर आभार ॲड.डी.पी.सदापुरे यांनी मानले.

## जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये

# नशा मुक्त भारत सशक्त भारत अभियान अंतर्गत नशामुक्तीची शपथ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा संलग्रित व श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांच्या मार्गदर्शनाखाली नशा मुक्त भारत सशक्त भारत अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांनी नशामुक्तीची शपथ देण्यात आली.

याप्रसंगी डॉ.विनायक भटकर, डॉ.अजय कुकडे, डॉ.रविकांत महिंदकर रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शशिकांत काळे, प्रमोद पाटील, निलेश खुरद, महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी अर्चना राऊत, डॉ.प्रज्ञा निंभोरकर, प्रा.ज्योती मरस्कोल्हे, डॉ.पुजा महाले, प्रा.प्रदीप आवारे, प्रा.लिलाधर चौधरी, प्रा.समीक्षा बिडकर, प्रा.रुपाली सवई, प्रा.तेजश्री घोटकर, प्रा.सिमा कानडे, प्रा.श्वेता लोखंडे, प्रा.रेणुका वानखडे, निलेश बंदे, रासेयो स्वयंसेवक तनुजा पोकळे, आदित्य उमेकर, किरण खंते, रागिनी बारमासे, कृतिका चरपे, गायत्री भंडारे, कृणाल चव्हाण, पवन धुर्वे, अभिषेक धुर्वे, अजय ढोमणे, ईश्वरी बोहरूपी, ऋतुजा ढोकणे, भूमिका ढोकणे, देवश्री शेंडे, लवकेश नांदणे, हर्षल हिरणवार, पियुष बडोदेकर, वैष्णव नरसिंगकर, यशवंत कुसराम, कृणाल चव्हाण, योगेश कुरवाडे, अक्षय बहुरूपी, चैतन्य रावेकर, चंदन देशमुख, नकुल कुरवाडे इत्यादी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# प्रत्येक पॅकेटच्या दर्शनीय भागात सूचना देणे बंधनकारक,शिशु आहाराच्या जाहिरातींवर राज्यात एफडीए कडून निर्बंध

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – अन्न व औषध प्रशासनाने हॉटेल आणि रेस्टॉरंट्सच्या कारवाईनंतर आता आपला मोर्चा सहा महिन्यांच्या आतील बालकांना देण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांकडे वळवला आहे. चिमुकल्या बालकांसाठीच्या प्रत्येक पॅकेटवर आई किंवा बाळाचे चित्र छापण्यासही बंदी घालण्यात आली आहे. या आहाराचा प्रचार व जाहिरात करता येणार नाही. तसेच शिशु किंवा महिलेची चित्रे आणि ‘ह्यूमनाइज्ड’, कम्प्लिट फूड आणि हेल्थ फूड यांसारख्या शब्दांचा वापर करण्यास एफडीएकडून मनाई करण्यात आली आहे. शिशु पोषणासाठी वापरल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांच्या उत्पादनापासून विक्री आणि जाहिरातीपर्यंतच्या प्रक्रियेवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कठोर नियम लागू केले आहेत.

## कोटा रँकर्स अकादमी येथे

# परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना डॉ.शाश्वत भड यांचे मार्गदर्शन



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक कोटा रँकर्स अकादमी येथे जे ई व नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी डॉ.शाश्वत भड यांच्या मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत स्पर्धा परीक्षेची तयारी, अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन तसेच संकल्पना समजुन घेऊन सातत्याने सराव करण्याबाबत मार्गदर्शन केले.

जे ई व नीट सारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळिवण्यासाठी नियमित अभ्यास, योग्य नियोजन आणि आत्मविश्वास महत्त्वाचा असल्याचे डॉ.शाश्वत भड यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमाला प्रा.डॉ.अवनिश मिश्रा तसेच कोटा रँकर्स अकादमीचे संचालक प्रभानशू सिंह यांची प्रमुख उपस्थिती होती. अकादमीतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मार्गदर्शन सत्रामुळे विद्यार्थ्यांना जे ई व नीट परीक्षेच्या तयारीसाठी नवी दिशा व प्रेरणा मिळाली.

## नागपुरच्या सायन्स कॉलेज मध्ये

# ‘इको-रील एआय चॅलेंज २०२६’च्या विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**नागपूर** – सायन्स कॉलेज, काँग्रेस नगर, नागपूर येथे ‘भारती’ मॅगझिनच्या नव्या पर्वाचा शुभारंभ; कुलगुरू डॉ.मनाली शिरसागर यांच्या हस्ते ‘इको-रील एआय चॅलेंज २०२६’च्या विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती संचालित सायन्स कॉलेज, काँग्रेस नगर, नागपूर येथे महाविद्यालयीन ‘भारती’ मॅगझिनच्या नव्या पर्वाचा शुभारंभ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.मनाली शिरसागर यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमास गेस्ट ऑफ ऑनर म्हणुन कार्यकारी सदस्य हेमंत काळमेघ, दिलीप इंगोले, किनीकर आणि गजानन पुंडकर उपस्थित होते तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमराज देशमुख, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ.आर.एच.महाखोडे, ‘भारती’ मॅगझिनच्या संयोजिका डॉ.शरयू देशमुख, डॉ.अनिता बुद्धेआणि डॉ.रेश्मा सोनवळकर डॉ.वाय.के.मेश्राम, डॉ.महेश फाळके यांच्यासह महाविद्यालयातील सर्व वरिष्ठ प्राध्यापक, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याच कार्यक्रमात वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित ‘इको-रील एआय चॅलेंज २०२६’ या आंतरमहाविद्यालयीन व आंतरविद्यापिठीय ऑनलाईन पर्यावरण विषयक रील स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा कुलगुरू डॉ.मनाली शिरसागर यांच्या हस्ते ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरुकता निर्माण करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करण्यास प्रोत्साहन देणे आणि पर्यावरणपूरक विचार सर्जनशील माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवणे हा होता. स्पर्धेला विविध महाविद्यालये व विद्यापीठांमधून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेत प्रथम तनु गुटके, द्वितीय इकरा शेख, तृतीय सपना मिश्रा तर उत्तेजनार्थ पारितोषिक संस्कृती चव्हाण यांनी मिळविले. सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

‘भारती’ मॅगझिनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या लेखन, कला व सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळाले तर ‘इको-रील एआय चॅलेंज २०२६’ च्या माध्यमातून पर्यावरण जागृतीसोबतच कृत्रिम बुद्धिमत्तेचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# संपादकीय

**{ आपले ध्येय ठरवा, आणि त्यासाठी मेहनत करा. }**

## लालबागच्या राजाच्या प्रसादातून वीज निर्मिती

४२ टन ओल्या कचऱ्याचे जैविक प्रक्रियेत रूपांतर; रुग्णालयातील वॉर्डला मिळणार वीज धार्मिक श्रद्धा आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर संगम घडवून आणणारी कोणतीही कल्पना समाजासाठी प्रेरणादायी ठरते. मुंबईतील प्रसिद्ध लालबागच्या राजाच्या गणेशोत्सवातून निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्याचे जैविक प्रक्रियेद्वारे रूपांतर करून त्यातून वीज निर्मिती करण्याचा उपक्रम याच दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरतो. तब्बल ४२ टन ओला कचरा जैविक प्रक्रियेत वापरून त्यापासून ऊर्जा निर्माण करण्याची संकल्पना म्हणजे 'कचरा' ही समस्या नसून योग्य व्यवस्थापन केल्यास तो संसाधन ठरू शकतो, याचा प्रत्यय देणारी आहे. गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. लाखो भाविक गणरायाचे दर्शन घेण्यासाठी मंडपांमध्ये येतात. त्यांच्यासाठी प्रसाद, फुले, नैवेद्य, भोजन आणि विविध धार्मिक साहित्याचा वापर केला जातो. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर ओला कचरा निर्माण होतो. हा कचरा जर नेहमीच्या पद्धतीने संकलित करून थेट कचरा डेपोवर नेला, तर त्याची विल्हेवाट लावण्याबरोबरच दुर्गंधी, प्रदूषण आणि जागेची समस्या निर्माण होते. मात्र याच कचऱ्याचे शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन केले तर त्यातून जैविक ऊर्जा निर्माण करता येते. लालबागच्या राजाच्या मंडळाने या दिशेने उचललेले पाऊल केवळ एका गणेश मंडळापुरते मर्यादित न राहता इतर सार्वजनिक मंडळांसाठीही मार्गदर्शक ठरू शकते. धार्मिक उत्सव आणि पर्यावरणपूरक व्यवस्थापन यांचा मेळ घालणे ही आजची गरज आहे. उत्सव साजरा करताना निर्माण होणाऱ्या कचऱ्याची जबाबदारीही आयोजकांनी आणि भाविकांनी स्वीकारणे आवश्यक आहे. जैविक प्रक्रियेत ओल्या कचऱ्याचे विघटन करून त्यातून बायोगॅस तयार केला जातो. या वायूचा योग्य तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ऊर्जानिर्मितीसाठी उपयोग करता येतो. अशा पद्धतीमुळे कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यास मदत होते आणि त्याच वेळी त्यातून उपयुक्त ऊर्जा उपलब्ध होते. म्हणजेच एका बाजूला स्वच्छता आणि दुसऱ्या बाजूला ऊर्जाङ्घया दोन्ही गरजा एकाच प्रक्रियेत साध्य होऊ शकतात. या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे निर्माण होणारी वीज रुग्णालयातील वॉर्डसाठी वापरण्याची कल्पना. गणेशोत्सवातील भक्ती आणि समाजसेवेचा हा संबंध विशेष अर्थपूर्ण आहे. भाविकांनी श्रद्धेने अर्पण केलेल्या प्रसादातून निर्माण होणाऱ्या ऊर्जेचा उपयोग रुग्णांच्या सेवेसाठी झाला, तर धार्मिक उपक्रमाला सामाजिक उपयोगितेची नवी दिशा मिळते. मंदिर, गणेश मंडळे आणि धार्मिक संस्था केवळ आध्यात्मिक केंद्रे न राहता पर्यावरण आणि समाजहिताच्या उपक्रमांची केंद्रे बनू शकतात, हे यातून स्पष्ट होते.

# मतचोरीच्या आरोपांपासून निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेपर्यंत

**निवडणूक प्रक्रियेवरील प्रश्नांना उत्तरांची गरज; इंडिया आघाडीच्या आंदोलनाने पुन्हा ऐरणीवर आणला लोकशाहीतील विश्वासाचा मुद्दा**

लोकशाहीची खरी ताकद निवडणुकीत आहे आणि निवडणुकीची खरी ताकद मतदाराच्या विश्वासात आहे. मतदाराने दिलेले मत सुरक्षित आहे, त्याची योग्य नोंद झाली आहे आणि त्याच्या मताचा परिणाम निष्पक्षपणे निकालात प्रतिबिंबित होतो, हा विश्वास लोकशाहीचा मूलभूत आधार आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेबाबत शंका उपस्थित झाल्या की त्याकडे केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप म्हणून पाहणे पुरेसे ठरत नाही. त्या शंकांना तथ्यांच्या आधारे स्पष्ट उत्तर मिळणेही तितकेच आवश्यक असते.




अलीकडच्या काळात विरोधकांनी 'व्होट चोरी'चा आरोप करत निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमितता, मतदारयाद्यांमधील बदल आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. काँग्रेससह काही विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवर आणि स्वायत्ततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून आंदोलनाची भूमिका घेतली आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये या विषयावर विरोधकांचा आक्रमक सूर अधिक तीव्र झाला आहे.

मात्र येथे एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. 'मतचोरी झाली' किंवा एखाद्या नेत्याने निवडणूक चोरून जिंकली, हा राजकीय आरोप आहे; तो सिद्ध झालेला तथ्य म्हणून मांडणे योग्य ठरणार नाही. निवडणूक आयोगाने यापूर्वीही निवडणूक प्रक्रियेवरील विविध आरोप फेटाळले आहेत. त्यामुळे लोकशाहीच्या दृष्टीने योग्य मार्ग म्हणजे आरोपांची स्वतंत्र आणि पारदर्शक पडताळणी होणे.

या वादाच्या केंद्रस्थानी मतदार याद्यांचे पुनरावलोकन अर्थात Special Intensive Revision अर्थात SIR आहे. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार मतदारयाद्या अद्ययावत ठेवणे, पात्र मतदारांची नोंद करणे आणि अपात्र किंवा चुकीच्या नोंदी दूर करणे ही निवडणूक व्यवस्थेचा भाग आहे. मात्र या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात नावे वगळली जात असल्याचा विरोधकांचा दावा आहे. 'इंडियन एक्स्प्रेस'च्या अहवालानुसार, निवडणूक आयोगातील दोन आयुक्तांनी डखठ संदर्भातील काही निर्णयांवर अनेक वेळा आक्षेप नोंदवले असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे.

यामुळे प्रश्न केवळ कोणता पक्ष काय म्हणतो, एवढ्यावर थांबत नाही. मतदारयादीतून एखाद्या पात्र नागरिकाचे नाव वगळले गेले तर त्याच्या मतदानाच्या अधिकारावर परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे मृत व्यक्ती, स्थलांतरित मतदार किंवा दुबार नोंदी यांसारख्या चुका मतदारयादीत राहिल्या तरी निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे मतदारयादीची शुद्धता ही सत्ताधारी आणि विरोधक या दोघांच्याही हिताची बाब आहे.

महाराष्ट्रातील डखठ प्रक्रियेच्या संदर्भात २.०७ कोटी नावे मसुदा मतदारयादीतून वगळल्याचा आकडा चर्चेत आला. मात्र निवडणूक आयोगाने हा आकडा अंतिम वगळलेल्या मतदारांची संख्या मानू नये, असे स्पष्ट केले होते. त्यामुळे अशा आकड्यांचे अंतिम निष्कर्ष काढण्यापूर्वी संपूर्ण प्रक्रिया आणि अंतिम मतदारयादी पाहणे आवश्यक आहे.

याच पार्श्वभूमीवर विरोधकांनी निवडणूक आयोगाविरोधात देशव्यापी आंदोलनाची भूमिका घेतली आहे. काँग्रेसच्या कार्यकारिणीने आयोगाच्या प्रमुखांच्या राजीनाम्याची मागणी केली असून डखठ संदर्भातही आक्षेप नोंदवले आहेत. इंडिया आघाडीच्या माध्यमातून या विषयाला व्यापक राजकीय आंदोलनाचे स्वरूप देण्याची तयारी सुरू असल्याचे वृत्त आहे.

आंदोलन करणे हा विरोधकांचा लोकशाही अधिकार आहे. परंतु आंदोलनाची धार वाढवताना आरोप आणि सिद्ध तथ्य यातील फरक कायम ठेवणेही आवश्यक आहे. 'मतचोरी'सारखा शब्द जनमानसात तीव्र प्रतिक्रिया निर्माण करतो. त्यामुळे अशा आरोपांसोबत मतदारयादीतील नेमकी कोणती नावे, कोणत्या कारणाने वगळली गेली, त्याविरोधात किती हरकती आल्या, किती नावे पुन्हा समाविष्ट झाली आणि संपूर्ण प्रक्रियेची पडताळणी कशी झाली, याची माहिती सार्वजनिक होणे अधिक महत्त्वाचे आहे.

निवडणूक आयोग हा भारतीय संविधानाने निर्माण केलेला स्वायत्त घटनात्मक प्राधिकरण आहे. लोकसभा, राज्यसभा, विधानसभा तसेच राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती यांच्या निवडणूक प्रक्रियेचे प्रशासन करण्याची जबाबदारी आयोगावर आहे. त्यामुळे आयोगाच्या स्वायत्ततेवर प्रश्न उपस्थित झाले तर त्या प्रश्नांना गांभीर्याने उत्तर देणे आवश्यक आहे. त्याचवेळी आयोगावर आरोप करणाऱ्यांनीही पुरावे आणि दस्तऐवजांच्या आधारे आपली बाजू मांडणे अपेक्षित आहे.

या वादात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे राजकीय पक्षांमधील परस्पर विश्वास. सत्ताधारी पक्षाने विरोधकांच्या प्रत्येक प्रश्नाला केवळ राजकीय कट म्हणून नाकारले, तर संशय अधिक वाढू शकतो. दुसरीकडे विरोधकांनी प्रत्येक निवडणूक पराभवाचे कारण मतचोरी असल्याचे सांगितले, तरी त्यातून निवडणूक प्रक्रियेवरील जनविश्वास कमकुवत होऊ शकतो. त्यामुळे दोन्ही बाजूंनी संस्थात्मक प्रक्रियेला महत्त्व देणे गरजेचे आहे.

लोकशाहीत विजय आणि पराभव हे निवडणुकीचे स्वाभाविक परिणाम आहेत. मात्र त्या निकालाची स्वीकारार्हता मतदारांच्या विश्वासावर अवलंबून असते. म्हणूनच निवडणूक आयोगाची कार्यपद्धती अधिक पारदर्शक करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांना समान माहिती उपलब्ध करून देणे, मतदारयादीतील बदलांची कारणे स्पष्ट करणे, हरकतींचे निवारण वेळेत करणे आणि आवश्यक तेथे स्वतंत्र तपासणीची व्यवस्था करणे या उपायांवर चर्चा होणे आवश्यक आहे.

निवडणूक प्रक्रियेबाबत तक्रार असल्यास नागरिकांसाठी निवडणूक आयोगाने तक्रार नोंदविण्याची आणि तिचा मागोवा घेण्याची यंत्रणाही उपलब्ध केली आहे. आयोगाच्या National G$rievance Services Portal वर मतदार नोंदणी, मतदारयादी, मतदान केंद्र, एतच आणि निवडणूक गैरप्रकारांशी संबंधित तक्रारी नोंदवता येतात.

आज गरज आहे ती घोषणांच्या राजकारणापेक्षा पुराव्यांच्या राजकारणाची. 'कोण मतचोर?' हा प्रश्न राजकीय व्यासपीठावर घुमत राहण्यापेक्षा 'मतदारयादीत नेमके काय झाले?' हा प्रश्न दस्तऐवजांच्या आधारे सोडवला गेला पाहिजे. मतदाराचे नाव चुकीने वगळले गेले असेल तर ते पुन्हा समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुलभ असावी. अनियमितता सिद्ध झाली तर जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. आणि आरोप निराधार असतील तर तेही स्पष्टपणे समोर आले पाहिजेत.

लोकशाहीचे रक्षण केवळ संसदेत भाषणे करून किंवा रस्त्यावर मोर्चे काढून होत नाही. ते मतदाराच्या अधिकाराचा सन्मान, संस्थांची स्वायत्तता, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि तथ्याधारित सार्वजनिक चर्चेतून होते. इंडिया आघाडीचे आंदोलन असो किंवा सत्ताधारी पक्षाची भूमिका असोअंतिम केंद्रबिंदू असला पाहिजे तो भारतीय मतदार.

कारण मत हे केवळ एका बटनावर दाबलेले चिन्ह नाही; ते नागरिकाच्या सार्वभौम अधिकाराचे प्रतीक आहे. त्या अधिकाराबद्दल संशय निर्माण झाला तर त्याचे निरसन करणे ही संपूर्ण लोकशाही व्यवस्थेची सामूहिक जबाबदारी आहे. निवडणूक आयोगावर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना पुराव्यांसह उत्तर मिळाले पाहिजे आणि आयोगावर विश्वास ठेवणाऱ्यांनाही पारदर्शकतेची खात्री मिळाली पाहिजे.

शेवटी प्रश्न मोदींचा, शाहांचा किंवा कोणत्याही एका पक्षाचा नाही. प्रश्न आहे तो भारतीय लोकशाहीतील सर्वात मूलभूत विश्वासाचामतदाराचे मत सुरक्षित आहे का? या प्रश्नाचे उत्तर राजकीय घोषणांनी नव्हे, तर पारदर्शक प्रक्रिया, सार्वजनिक आकडेवारी, स्वतंत्र पडताळणी आणि घटनात्मक संस्थांच्या विश्वासार्ह कामकाजातून मिळाले पाहिजे. तेव्हाच निवडणूक जिंकणारा पक्ष कोणताही असो, विजय हा केवळ राजकीय राहणार नाही; तो लोकशाहीवरील जनतेच्या विश्वासाचाही विजय ठरेल.




# शेतातील 'पांढरे सोने' काळवंडण्याची भीती

कापूस उत्पादनात ५० ते ६० टक्क्यांपर्यंत घट होण्याचा अंदाज; शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकटाचे सावट

कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी यंदाचे हंगाम चिंतेचे ठरण्याची शक्यता आहे. प्रतिकूल हवामान, पावसातील अनियमितता, अतिवृष्टी तसेच पिकांवरील रोग-किडींचा प्रादुर्भाव यामुळे कापूस पिकाला मोठा फटका बसत आहे. कृषी विभागाच्या अंदाजानुसार कापूस उत्पादनात तब्बल ५० ते ६० टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर मोठा परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे.

'पांढरे सोने' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसावर विदर्भातील हजारो शेतकऱ्यांचे आर्थिक गणित अवलंबून आहे. उत्पादन घटल्यास शेतीचा वाढता खर्च, मजुरी, बियाणे आणि खतांचा खर्च भरून काढणे कठीण होऊ शकते. त्यामुळे शासनाने परिस्थितीचे तातडीने सर्वेक्षण करून पंचनामे करावेत, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य मदत व पीकविमा भरपाई मिळवून द्यावी, अशी अपेक्षा आहे.

कापूस उत्पादनातील मोठी घट ही केवळ शेतकऱ्यांची समस्या नसून संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारी बाब आहे. त्यामुळे प्रशासनाने शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन, रोग-किड नियंत्रणासाठी उपाययोजना आणि आवश्यक आर्थिक मदत वेळेत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या अर्थकारणाचा प्रमुख आधार असलेल्या कापूस पिकावर यंदा संकटाचे सावट निर्माण झाले आहे. प्रतिकूल हवामान, पावसातील अनियमितता, अतिवृष्टीचा परिणाम तसेच विविध रोग-किडींच्या प्रादुर्भावामुळे कापूस पिकाची वाढ आणि उत्पादनावर परिणाम झाला आहे. परिणामी यंदा कापूस उत्पादनात तब्बल ५० ते ६० टक्क्यांपर्यंत घट होण्याचा अंदाज कृषी विभागाकडून व्यक्त करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.




कापूस हे विदर्भातील शेतकऱ्यांसाठी केवळ एक पीक नसून त्यांच्या वर्षभराच्या आर्थिक नियोजनाचा आधार आहे. बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि मशागतीवर मोठा खर्च करून शेतकऱ्यांनी कापसाची लागवड केली. मात्र अपेक्षित उत्पादन न मिळाल्यास हा खर्चही वसूल होणे कठीण होणार आहे. उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांच्या हातात येणारे उत्पन्न कमी होण्याची शक्यता असून ग्रामीण बाजारपेठेवरही त्याचा परिणाम होऊ शकतो.

यंदाच्या हंगामात अनेक भागांत हवामानातील बदलाचा कापूस पिकाला फटका बसला आहे. पिकाच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाचे प्रमाण आणि तापमानातील चढ-उतार यामुळे झाडांच्या वाढीवर परिणाम झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. काही भागांत रोग व किडींच्या प्रादुर्भावामुळे फवारणीचा खर्चही वाढला आहे. त्यामुळे उत्पादन घटण्याबरोबरच उत्पादन खर्च वाढण्याचे दुहेरी संकट शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहे.

'पांढरे सोने' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसाचे उत्पादन कमी झाल्यास बाजारातील आवकही घटण्याची शक्यता आहे. मात्र केवळ बाजारभाव वाढणे हा शेतकऱ्यांसाठी दिलासा ठरणार नाही. उत्पादनात मोठी घट झाल्यास वाढलेल्या भावातूनही एकूण उत्पन्नाची भरपाई होईलच असे नाही. त्यामुळे शासनाने उत्पादनातील घट आणि प्रत्यक्ष नुकसान याचा वस्तुनिष्ठ आढावा घेणे आवश्यक आहे.

कृषी विभागाने गावनिहाय पाहणी करून नुकसानग्रस्त क्षेत्राची नोंद करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. पीकविमा योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना वेळेत भरपाई मिळावी, तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीसाठी शासनाने मदतीचे निकष सुलभ करावेत, अशी अपेक्षा आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना रोग-किड नियंत्रणासाठी योग्य मार्गदर्शन आणि आवश्यक उपाययोजना उपलब्ध करून देणेही महत्त्वाचे आहे.

कापूस उत्पादनातील ५० ते ६० टक्क्यांची संभाव्य घट ही बाब गांभीर्याने घेण्याची गरज आहे. कारण त्याचा परिणाम केवळ शेतकऱ्यांच्या उत्पन्नावरच नव्हे, तर मजूर, जिनिंग-प्रेसिंग उद्योग, वाहतूक आणि ग्रामीण बाजारपेठेवरही होतो.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत लोणीच्या आर.सी.चांडक विद्यालयाच्या अंतराचे सुयश

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – सुशिल बेले मित्रपरिवार व आक्रोश जनशक्ती संघटना तसेच महिला विद्यार्थी व युवा संघटन यांच्या संयुक्त विद्यमाने श्री.साई मंदिर या ठिकाणी आयोजीत जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत लोणीच्या श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयाची वर्ग ८ ची अंतरा उमेश अकर्ते हिने चतुर्थ क्रमांक पटकावित सन्मानचिन्ह,



प्रशस्तीपत्र व रोख १ हजार ५०० रुपयांच्या पारितोषिकाची मानकरी ठरली.

तीने पेपर फुटीचा विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर होणारा परिणाम या विषयावर अतिशय आत्मविश्वासपूर्ण, मार्मिक, संवेदनशीलपणे भावनिक साद घालत अप्रतिम व प्रभावीपणे आपले विचार विचारपिठावर मांडले. विचारपिठावर उपस्थित परिक्षक व श्रोत्यांना अंतराने आपल्या अमोघ व प्रभावी वाणीने मंत्रमुग्ध केले. संपूर्ण जिल्हयातून एकुण ७८ स्पर्धक या स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. वर्ग ८ ते १२ च्या विद्यार्थ्यांकरिता हे आयोजन होते. विशेष म्हणजे अंतरा हिने सर्वात लहान असून स्पर्धेत बाजी मारली.

अंतरा तिच्या यशाचे श्रेय आई तृप्ती, वडिल उमेश अकर्ते तसेच मुख्याध्यापक एस.व्ही.खोडे, पर्यवेक्षक व्ही.एच.चिमोटे तसेच सर्व शिक्षकांना देते. अंतराच्या या यशाबददल तिचे लोणी व परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.



**वरुड :** माजी आमदार, सहकार महर्षी नरेशचंद्र ठाकरे यांना पुष्पगुच्छ देवुन वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना दशरथ गाडगे, नामदेव ठाकरे, अरविंद वानखडे, नितीन ठाकरे, संजय फुटाणे, शिवशंकर गोरले, रामभाऊ जाणे, सुनील ठाकरे, रुपराव लव्हाळे, दामोदर ठाकरे, श्याम देशमुख, अरुण परतेती, संजय खाडे, संजय गाडबैल, सुनील ब.ठाकरे व मित्र परिवार.

## स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालयाच्या

# लावण्याचे उत्कृष्ट वक्तृत्व स्पर्धेमध्ये यश

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**वरुड** – स्थानिक स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय येथील वर्ग ९ ची विद्यार्थिनी लावण्या गोपाल खराळकर हिने नुकत्याच पार पडलेल्या साई मंदिर सभागृह येथील सुशील बेले मित्र परिवार द्वारा आयोजित शववाहन लोकार्पण सोहळा आणि जिल्हास्तरीय भव्य वक्तृत्व स्पर्धा शेतकरी आणि विद्यार्थी या विषयावर ४ मिनिटाच्या वेळेत प्रभावी उत्कृष्ट वक्तृत्व सादरीकरण केल्याने या स्पर्धेमध्ये यश मिळवता आले.

तिला प्रमाणपत्र, शिल्ड आणि रोख रक्कम ५०० रुपये देण्यात आले. या स्पर्धेत जिल्ह्यातून ८० स्पर्धक सहभागी झाले होते. सर्व स्पर्धकांनी अतिशय महत्त्वाचे प्रभावी मुद्दे मांडले. त्यात लावण्याने शेतकरी आणि विद्यार्थी यांच्यातील सहसंबंध सांगताना विद्यार्थ्याला शेतीचे पारंपरिक व आधुनिक तंत्रज्ञानां ची माहिती शिक्षण घेत असताना माहिती असणे खुप आवश्यक आहे हे ठणकावून सांगितले. आपला देश आपला विद्यार्थी जर म्हणत असेल तर आपला विद्यार्थी आपली शेती ही मानसिकता ठेवली पाहिजे, असे सांगताना प्रत्यक्ष विविध वनस्पतीचे रोपटे दाखवुन विद्यार्थ्यांनी त्याची ओळख करुन घेतली पाहिजे. तंत्रज्ञानाशी जोड लावता आली पाहिजे असे सांगितले. यावेळी मुख्याध्यापक विजय आडे, पर्यवेक्षिका माधुरी मेश्राम व सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी लावण्याचे कौतुक अभिनंदन केले.

# वरुड अर्बन को-ऑप.बँकेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*







**वरुड** – शहरातील सहकारक्षेत्रात अग्रणी असलेल्या वरुड अर्बन को-ऑप.बँकेचा २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच शहरातील रामदेवबाबा मंगलम येथे आयोजीत करण्यात आली होती.

या सभेमध्ये मागील सर्व साधारण सभेचा वृत्तांत वाचन करणे, बँकेच्या सनब २०२५-२६ चा वार्षिक अहवाल, नफा-तोटा पत्रक आणि ताळेबंद पत्रकास मंजुरात देणे, सन २०२५-२६ वर्षांकरीता संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे अंदाजपत्रकास मंजुरी देणे, सन २०२५-२६ सालाच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरात देणे, दि.३१ मार्च २०२६ चा ऑडीट अहवालास मान्यता देणे, सन ३१ मार्च २०२६ व सभेच्या तारखेपर्यंत भागाची रक्कम परत करुन सभासदत्व कमी केलेल्या प्रकरणी मान्यता देणे, महाराष्ट्र शासनाचे समोपचार योजनेचे धर्तीवर तयार केले व आर.बी.आय.ची एकरकमी परतफेड योजनेस समाविष्ट प्रकरणास मान्यता देणे तसेच वरील योजनेस सन २०२७ पर्यंत मुदतवाढ देणे, बँकेच्या सुधारीत लोन पॉलीसी, गुंतवणूक पॉलीसी, वसुली पॉलीसीला मान्यता देणे, सन २०२६-२७ साठी सनदी लेखापालास मान्यता देणे, एकरकमी परतफेड केलेल्या कर्जदाराच्या प्रकरणांना मान्यता देणे तसेच अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करुन मान्यता देण्यात आली. यावेळी माहीती देतांना बँकेचे अध्यक्ष किशोर भोंड यांनी आमची बँक सतत ४ वर्षांपासुन अ वर्ग श्रेणीमध्ये असून बँकेला एकुण ५.४१ रुपयांचा नफा झालेला असून बँकेचे सभासद, ग्राहक, कर्जदार, ठेविदार आणि हितचिंतकांच्या सहकार्याने बँक प्रगतीकडे वाटचाल करीत असल्याचे सांगितले. या वार्षिक सर्वसाधारण सभेला वरुड अर्बन को-ऑप.बँकेचे अध्यक्ष किशोर भोंड, उपाध्यक्ष दिपक दुपारे, संचालक शंतनु सोलव, शिवदत्त शिंदे, हेमंत देशमुख, डॉ.अजय भागवतकर, श्रीधर सोलव, निरंजन नागमोते, संजय गेडाम, देवेंद्र खेरडे, डॉ.सैयद गौस अली, शुभम कराळे, संचालिका सुनंदा खोले, दमयंती राठी, तज्ञ संचालक विनायक नारिंगे, ॲड.तुषार घोरमाडे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन प्रविण दंडाळे, प्रास्तविक अध्यक्ष किशोर भोंड तर उपस्थितांचे आभार संचालक डॉ.अजय भागवतकर यांनी मानले.

या सभेच्या यशस्वितेसाठी वरुड अर्बन को-ऑप.बँकेचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी आर.ए.राऊत, शाखा व्यवस्थापक तथा वसुली अधिकारी प्रविण दंडाळे, इन्स्पेक्टर अधिकारी राहुल वहेकर, लिपीक निळकंठ ढोक व सुहास ठाकरे यांनी परिश्रम घेतले.

# शेतातील पांढरे सोने काळवंडणार : कापूस उत्पादन ५० ते ६० टक्के घटण्याचा कृषी विभागाचा अंदाज

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**जळगाव** – कापसाचा सर्वाधिक पेरा होणारा जिल्हा म्हणून जळगाव जिल्ह्याचा लौकिक असला तरी यंदा पावसाचा पडलेला मोठा खंड आणि त्यातून दुष्काळाचा फटका कापसाला बसणार आहे. कृषी विभागाच्या माहितीनुसार, यंदा जळगाव जिल्ह्यात कोरडवाहू कापसाच्या उत्पादनात ५० ते ६० टक्के घट येण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

पांढरे सोने आणि जळगावच्या अर्थकारणावर परिणाम करणारे कापसाचे हे पीक आहे. राज्यात सर्वाधिक कापसाचा पेरा हा जळगाव जिल्ह्यात होतो. जळगावमध्ये दरवर्षी किमान साडेपाच लाख हेक्टरमध्ये कापसाची लागवड होत असली तरी यंदा कापसाला भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी कापूस पेरण्याकडे पाठ फिरवली आणि ४ लाख ३५ हजार हेक्टरमध्ये कापसाची लागवड झाली. मध्यंतरी चांगला झालेला पाऊस पाहता, कापसाचे उत्पादन बऱ्यापैकी येईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र महिनाभरापेक्षा जास्त मोठा पावसाचा खंड पडला आणि शेतकऱ्यांच्या आशेवरही पाणी फेरले.

कृषी विभागाच्या अंदाजानुसार, कापूस उत्पादनात ५० ते ६० टक्के घट होण्याची शक्यता आहे. कारखाने एकाच शिफ्टमध्ये चालणार विशेषत: जेव्हा १५ लाख गाठींचे कापसाचे उत्पादन होत असते, त्यावेळेस जिनिंग कारखाने हे तीन शिफ्टमध्ये चालवले जातात. यंदा ८ ते ९ लाख गाठींचे उत्पादन झाल्यास ते एकाच शिफ्टमध्ये चालवावे लागतील. कपाशीच्या बिया म्हणजेच सरकी कमी उपलब्ध झाल्याने त्यापासून निघणाऱ्या तेल उत्पादनावरही परिणाम होईल. या सर्वांचा फटका एकंदरीत रोजगारावर होईल, अशी भीती खान्देश जिनिंग कारखानदार संघाचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप जैन यांनी व्यक्त केली.

गुजरातमध्ये होणारी अवैध वाहतूक रोखणार जळगाव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर कापसाचे उत्पादन होत असले तरी गुजरातमधील जिनिंग कारखान्यांसाठी येथील कापसाची मोठ्या प्रमाणावर अवैध मार्गाने वाहतूक होते. ही वाहतूक रोखण्यात यश आले नाही तर त्याचादेखील फटका येथील कारखान्यांना बसतो, याकडे लक्ष वेधण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्याच्या घरात नेहमीपेक्षा कमी कापूस येणार असून यंदा कापसाला काय भाव मिळतो, याकडे आता शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

जळगाव जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पिकांची सद्यस्थिती व उत्पादनक्षमतेचा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी प्रत्यक्ष आढावा घेत विविध गावांमध्ये पीक पाहणी केली.


## जाहीर सुचना

सर्व आम जनतेस कळिवण्यात येते की, श्री.आनिल यादवराव राऊत व इतर यांच्याकडुन दिनांक २८/०९/२०२८ रोजी मौजा वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथील केदार चौकात खालील वर्णन केलेल्या मालमत्तेची नोंदणीकृत वाटणीपत्र हरवलेले आहे.

तरी कोणालाही आढळल्यास त्यांनी खालील पत्यावर किंवा संबंधीत व्यक्तीशी ७ दिवसाच्या आत संपर्क साधुन त्वरीत कळवावे, ही विनंती.

मालमत्तेचे वर्णनः–

मौजा वरुड, न.प.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, वार्ड नं.०७, याचा मालमत्ता क्र.१४९, शिट नं.१८, न.भु.क्र.२८२, क्षेत्रफळ ६४.०० चौ.मी जागेचे दिनांक २८/०८/२०२३ रोजीचे नोंदणीकृत वाटणीपत्र दस्त क्र.४४४३,

स्थळ:– वरुड
दिनांक:– २८/०९/२०२६

–: संपर्क :–
ॲड.मनिष रमेश विटाळकर
रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
मो.नं. ९५७९१११७७०


## कॉटनबी ॲग्रो प्रोड्युसर कंपनीच्या जिनिंग ॲन्ड प्रेसिंगच्या प्रकल्पास

# कृषि सहसंचालक गणेश घोरपडे यांच्यासह कृषि अधिकाऱ्यांची भेट

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**वरुड** – येथुन जवळच असलेल्या सुरळी नजीकच्या शेकापुर शेतशिवारात महामार्गावर उभारण्यात येत असलेल्या कॉटनबी ॲग्रो प्रोड्युसर कंपनीच्या जिनिंग ॲन्ड प्रेसिंगच्या प्रकल्पास अमरावतीचे विभागीय कृषि सहसंचालक गणेश घोरपडे यांच्यासह अन्य कृषि अधिकाऱ्यांनी भेट देवुन पाहणी करुन मार्गदर्शन केले.





यापसंगी सेवा संकल्प अभियान अंतर्गत कॉटनबी ॲग्रो प्रोड्युसर कंपनीच्या परिसरामध्ये पिंपळाच्या झाडाचे रोपण करुन त्या ठिकाणी आशिर्वादाचा दिवा लावण्यात आला.

शासनाच्या बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत शहापुर शेतशिवारामध्ये जिनिंग ॲन्ड प्रेसिंगच्या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून या प्रकल्पाच्या उभारणीमुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळण्याची अपेक्षा व्यक्त केल्या जात आहे.

शेतकऱ्यांकडून आणण्यात येणाऱ्या कापसावर प्रक्रिया करुन शेतकऱ्यांना बाजारपेठेपेक्षा अधिक भाव मिळवुन देण्याचा प्रयत्न शासन आणि कॉटनबी ॲग्रो प्रोड्युसर कंपनीच्या वतीने करण्यात येणार आहे.

विभागीय कृषि सहसंचालक गणेश घोरपडे यांनी उपस्थित संचालक मंडळ आणि शेतकऱ्यांना कंपनीला अधिकाधिक नफा कसा मिळविण्यासोबतच शेतकऱ्यांच्या कापसाला जास्तीत जास्त भाव कसा देता येईल? याबाबत मार्गदर्शन केले.

विभागीय कृषि सहसंचालक गणेश घोरपडे, स्मार्ट प्रकल्पाचे अमरावती विभागीय नोडल अधिकारी डॉ.प्रशांत नाईक, जिल्हा नोडल अधिकारी विवेक टेकाडे, एमआयएस तज्ञ मिलिंद वानखडे, यांत्रिकी सल्लागार ऋषिकेश भागडे, प्रभारी तांत्रिक कृषि अधिकारी मनिष भागवत, बेनोडाचे प्रभारी मंडल कृषि अधिकारी एम.कुकडे, वरुडचे प्रभारी मंडल कृषि अधिकारी डी.माहुरे, सहायक कृषि अधिकारी योगेश कडू यांचेसह कॉटनबी ॲग्रो प्रोड्युसर कंपनीचे संचालक अशोकराव निकम, प्रदीप बहुरुपी, चंद्रकांत भड, कविता बहुरुपी, मंजुश्री भड, मिलिंद निकम, मोनल भड आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्रासह ५ राज्यांना दुष्काळाचा विळखा : केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांची माहिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – यंदा पावसाने ओढ दिल्याने यंदाच्या खरीप हंगामात कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेशातील काही भाग, तेलंगणा आणि राजस्थानमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे, अशी माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी मंगळवारी दिली.

चौहान म्हणाले, 'आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेशातील रायलसीमा आणि लगतचे भाग, तेलंगणातील काही भाग तसेच राजस्थानातील काही भागांमध्ये दुष्काळाची चिंता आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितले की, ते स्वतः दुष्काळग्रस्त राज्यांचा दौरा करणार असून, संबंधित राज्य सरकारांच्या सतत संपर्कात राहणार आहेत. 'शेतजमीन पडीक राहू नये, हे आमचे तातडीचे उद्दिष्ट आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.

रब्बी हंगामासाठी मदत करणार आगामी रब्बी हंगामासाठी केंद्र सरकार राज्यांना कमी पाण्यात येणारी, कमी कालावधीत तयार होणारी तसेच स्थानिक माती आणि हवामानाला अनुकूल असलेली बियाणे व पिकांच्या वाणांची निवड करण्यास मदत करणार आहे. शेती सुरू ठेवण्यासाठी केंद्राकडून सहकार्य केले जाईल. तसेच राज्ये आणि इतर संबंधित घटकांमध्ये समन्वय व सहकार्य वाढविण्यासाठी केंद्र पुढाकार घेईल, असेही चौहान यांनी सांगितले.

# सहावीच्या गणिताने गुरुजींनाही फोडला घाम : अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या आकलनक्षमतेच्या पलिकडे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**कराड** – इयत्ता सहावीच्या यंदापासून बदललेल्या गणित अभ्यासक्रमातील काठिण्यपातळी आणि प्रश्नांच्या स्वरूपामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनीही डोक्याला हात लावला आहे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने अभ्यासक्रम बदलला आहे. हा अभ्यासक्रम निवडताना त्यात विद्यार्थ्यांचे वयोमान आणि त्यांच्या आकलन क्षमतेनुसार अभ्यासक्रमाची रचना केली नसल्याचा शिक्षकांचा व पालकांचा आक्षेप आहे.

पाचवीपर्यंतच्या तुलनेने सोपे गणित शिकलेल्या विद्यार्थ्यांना सहावीत गेल्यानंतर मोठमोठी समीकरणे आणि कठीण गणितांचा सामना करावा लागत आहे. त्रिमितीय आकारांचे जाळे, ऑयलरचे सूत्र तसेच गुंतागुंतीची शाब्दिक उदाहरणे देण्यात आली आहेत. विशेषतः सराव संचातील उदाहरणे आणि मूल्यमापनामधील उदाहरणात प्रचंड तफावत आहे. या अभ्यासक्रमाचा पुनर्विचार करून स्तरनिहाय सराव, पूरक पुस्तिका आणि विद्यार्थ्यांना समजेल अशी सुलभ मूल्यमापन पद्धती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी पालक-शिक्षकांकडून होत आहे.

सामान्यतः विद्यार्थ्यांना गणिताविषयी नावड असते. त्यातच त्याची काठिण्यपातळी वाढवल्यास विद्यार्थ्यांत न्यूनगंड वाढू शकतो. मुलांना अभ्यासक्रमाची गोडी लागावी आणि त्यांनी शिक्षणप्रवाहात टिकून राहावे अशी अभ्यासक्रमाची रचना असायला पाहिजे, अशी मागणीही शिक्षक व पालकांमधून होत आहे.

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी )**
**( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८१०/२०२६ ने.ता.२३/१०/२०२६**

**अर्जदार :-** १) श्री.राजेश दिवाकर व्हहोकर, वय अं.५७ वर्ष, धंदा-शेती, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती, २) ममता राजु सावरकर, वय अं.५८ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.प्रणोती सिंघम, पारीजात बंगला, प्लॉट नं.३६ जगन्नाथ बाबा नगर, दाताळा रोड, चंद्रपुर, ता.जि.चंद्रपुर, ३) संगिता समीर राऊत, वय अं.५३ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.५२-ए, बन्सीलाल नगर, स्टेशन रोड, संभाजीनगर, ता.जि.संभाजीनगर

**... विरुध्द ... गैरअर्जदार :-**

निलेश दिवाकर व्हहोकर, वय अं.५२ वर्ष, धंदा-शेती रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत दिवाकर गणपतराव व्हहोकर व मयत इंदिराबाई दिवाकर व्हहोकर, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२२/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ स्तर ),**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७९३/२०२६ ने.ता.२२/१०/२०२६**

**अर्जदार :-**

नत्थु कंगलु उर्फ कमलु झिटु धुर्वे
वय अं.६६ वर्ष, धंदा-मजुरी
रा.बाहदा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत कंगलु उर्फ कमलु झिटु धुर्वे व मयत रुखमाबाई कंगलु धुर्वे, रा.बाहदा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२२/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१६/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी )**
**( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७९४/२०२६ ने.ता.२२/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) केशव संतोष धुर्वे, वय अं.७३ वर्ष, धंदा-मजुरी
रा.बाहदा, ता.वरुड, जि.अमरावती
२) धनराज संतोष धुर्वे, वय अं.६० वर्ष, धंदा-मजुरी
रा.बाहदा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत संतोष झिटु धुर्वे व मयत मन्ना संतोष धुर्वे, रा.बाहादा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२२/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१६/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# गणेशोत्सवाचा जल्लोष : साखरचौथीच्या गणरायाचे उत्साहात आगमन : उरण, पेण, मुरूडसह ग्रामीण भागात भक्तिमय वातावरण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**उरण** – पितृपक्षात येणाऱ्या साखरचौथीच्या गणपतींची उरण तालुक्यात मंगळवारी (२९ सप्टेंबर) मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात स्थापना करण्यात आली. यंदा साखरचौथी अंगारकी चतुर्थीच्या शुभयोगावर आल्याने गणेशभक्तांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. विशेषतः चिरनेर गावात गणरायाचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले.

महाराष्ट्रातील उरण, पेण आणि पनवेल तालुक्यांत, विशेषतः आगरी समाजात, साखरचौथीच्या गणेशोत्सवाची जुनी परंपरा आहे. अनंत चतुर्दशीनंतर येणाऱ्या संकष्टी चतुर्थीला साखरचौथी किंवा गौरा गणपतीची प्रतिष्ठापना केली जाते. साधारणपणे दीड, अडीच, तीन किंवा पाच दिवसांनी या गणपतींचे विसर्जन केले जाते.

मुख्य गणेशोत्सवाच्या काळात काही कारणास्तव घरी किंवा मंडळात गणपतीची स्थापना करता न आलेले भाविक साखरचौथीला गणरायाची प्रतिष्ठापना करतात.

त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये मुख्य गणेशोत्सवानंतर पुन्हा एकदा उत्सवाचे वातावरण निर्माण होते.

रायगड जिल्ह्यात साखरचौथीच्या गणेशोत्सवाला मंगळवारी (२९ सप्टेंबर) मोठ्या उत्साहात सुरुवात झाली.

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी )**
**( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८०९/२०२६ ने.ता.३१/१०/२०२६**

**अर्जदार :-**

गायत्री पुंडलिक घोरमाडे
वय अं.२१ वर्ष, धंदा-गृहिणी
रा.हरनखुरी, पो.डिग्रस, ता.काटोल, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत पुंडलिक शिवरामजी घोरमाडे व मयत कुसूम पुंडलिक घोरमाडे, रा.ढगा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३१/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२२/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७८८/२०२६ ने.ता.२७/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती देवयानी लुकेशराव आकोटकर, वय अं.३६ वर्ष, धंदा-घरकाम, २) गुंजन लुकेशराव आकोटकर, वय अं.१३ वर्ष, धंदा-शिक्षण, ३) कुश लुकेशराव आकोटकर, वय अं.११ वर्ष, धंदा-शिक्षण, ४) विमल शेषराव आकोटकर, वय अं.६२ वर्ष, धंदा-घरकाम क्र.१ ते ४ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड (अर्जदार क्र.२ व ३ करीता अ.पा.क म्हणून अर्जदार क्र.१ आई)

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत लुकेश शेषरावजी आकोटकर, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२७/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१६/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७८९/२०२६ ने.ता.२२/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) सुधाकर मधुकर गुल्हाने, वय अं.५६ वर्ष, धंदा-मजुरी
२) गोपाल मधुकर गुल्हाने, वय अं.५४ वर्ष, धंदा-मजुरी
३) सुरेश मधुकर गुल्हाने, वय अं.४९ वर्ष, धंदा-मजुरी
क्र.१ ते ३ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती
४) सविता नरेशराव गुल्हाने, वय अं.४५ वर्ष, धंदा-घरकाम
रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत मधुकर देवराव गुल्हाने व मयत इंदीराबाई मधुकरराव गुल्हाने, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२२/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१६/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८३२/२०२६ ने.ता.२७/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) आशा वामनराव यावलकर, वय अं.७१ वर्ष, धंदा-गृहिणी
२) सौ.निलीमा राजु इंगोले, वय अं.५२ वर्ष, धंदा-गृहिणी
३) सारंग वामन यावलकर, वय अं.४५ वर्ष, धंदा- शेती
क्र.१ ते ३ रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत वामनराव बळीराम यावलकर, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२७/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२९/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**





# सीआयएसएफ जवानाने सहकाऱ्यांवर गोळ्या झाडल्या, असिस्टंट कमांडंट

## एस आय आणि दोन कॉन्स्टेबलसह चार जण जागीच ठार

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**जम्मू** – जम्मू-काश्मीरमधील काठुआ जिल्ह्यात मंगळवारी एका दुर्दैवी आणि खळबळजनक घटनेत सहाय्यक कमांडंटसह चार सीआयएसएफ जवान मृत्युमुखी पडले आहेत.

हिमाचल प्रदेशच्या सीमेला लागून असलेल्या बसोली भागातील मशका गावातील सेवा-३ पॉवर प्रोजेक्ट येथे ही घटना घडली. या गोळीबारात सहाय्यक कमांडंटसह 'सीआयएसएफ'चचचचचे एकूण चार जवान ठार झाले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, दोन जवानांमध्ये एका मुद्द्यावरून वाद झाला आणि त्यानंतर त्यातील एकाने अंदाधुंद गोळीबार केल्यामुळे ही मोठी दुर्घटना घडली. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.



# दिवसाढवळ्या घरात घुसून दरोड्याचा प्रयत्न : नागरिकांच्या तत्परतेमुळं पकडलेल्या चोरट्याचा संशयास्पद मृत्यू

## उलटसुलट चर्चांवर पोलिसांकडून स्पष्टीकरण

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**नागपुर** – नागपुरात घरात घुसून दरोडा घालणाऱ्या दोन चोरट्यापैकी एकाचा नंतर संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

नागपूरच्या बेलतरोडी पोलीस ठाणे हद्दीतील मॉडेल मिल कॉलोनीमध्ये धार्मिक कुटुंबीयांच्या घरी काल (२९ सप्टेंबर) दुपारी दोन चोरट्यांनी दरोडा घातला होता. त्यानंतर कथित जमावाच्या मारहाणीत चोराचा मृत्यू झाल्याच्या चर्चेप्रकरणी आता पोलिसांकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. जमावाने केलेल्या मारहाणीमुळे मृत्यू झाल्याच्या चर्चेला पोलिसांनी नकार दिला असून प्राथमिकदृष्ट्या आरोपीचा मृत्यू




नैसर्गिक असल्याची शक्यता वर्तवली आहे. त्यानंतर त्याला मेडिकल रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. दरम्यान, पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले त्यावेळी त्याच्या शरीरावर कोणतीही स्पष्ट जखम आढळून आली नाही. तसेच घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजमध्येही त्याला मारहाण झाल्याचे आढळून आलेले नसल्याचा पोलिसांचा दावा आहे. पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत चोराने चोरी केल्याची कबुली दिली असल्याची पोलिसांची माहिती आहे. परिणामी आता शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. तसेच नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# नवे स्टील धोरण लवकरच : ६०० दशलक्ष टन क्षमता गाठण्याचे सरकारचे उद्दिष्ट

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नवी दिल्ली** – उद्योग क्षेत्राची स्पर्धात्मक क्षमता वाढवणे आणि आयातीशी संबंधित आव्हानांना तोंड देणे तसेच २०४७ पर्यंत ६०० दशलक्ष टन स्टील उत्पादनाची क्षमता गाठणे, या उद्देशाने सरकार एक नवीन स्टील धोरण तयार करत आहे, अशी माहिती स्टील सचिव संदीप पौंड्रिक यांनी मंगळवारी दिली. येथे एका कार्यक्रमात सचिव म्हणाले की, नवीन 'राष्ट्रीय स्टील धोरण' भागधारकांच्या अभिप्रायासाठी एका आठवड्यात जनतेच्या माहितीसाठी जाहीर केले जाईल. हे नवीन धोरण २०४७ पर्यंत भारतीय स्टील उद्योगासाठी एक रोडमॅप तयार करेल, ज्या अंतर्गत उच्च दर्जाचे मूल्यवर्धित



आणि विशेष स्टीलच्या मोठ्या भागासह ६०० दशलक्ष टनांपेक्षा अधिक क्षमता गाठण्याचे लक्ष्य ठेवली जाईल. आयातीबाबत धोरणामध्ये स्वस्त आणि निकृष्ट दर्जाच्या आयातीला आळा घालण्यासाठी सुरक्षा शुल्क, अँटी-डम्पिंग ड्युटी यांसारख्या सुरक्षा उपायांचा समावेश आहे. भारतीय स्टील उद्योगाला, विशेषतः लहान स्टील उत्पादकांना तंत्रज्ञान आणि किमतीच्या बाबतीत स्पर्धात्मक बनवण्यासाठीही उपाययोजना केल्या गेल्या आहेत.

# अनुकंपा नियुक्ती हा नोकरी अधिकार नाही : उच्च न्यायालयाचा निवाळा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – अनुकंपा नियुक्ती हा नोकरी मिळवण्याचा कोणताही हक्काचा अधिकार नाही. अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसाठी मृत्यूच्या वेळचेच धोरण लागू होतील. नंतरचे नियम लागू करता येणार नाहीत, असा निवाळा उच्च न्यायालयाने दिला. न्या. सुमन श्याम आणि न्या. गौतम अंखड खंडपीठाने हा निकाल दिला.

दौंड येथील रहिवासी ऋषिकेश चव्हाण यांनी याचिका दाखल केली होती. त्यांचे वडील बालभारती (पुणे) येथे 'सीनिअर असिस्टंट स्टोअर कीपर' म्हणून कार्यरत होते आणि २८



ऑगस्ट २०१९ रोजी सेवेत असताना त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर तत्कालीन २०१७च्या धोरणानुसार अनुकंपा नियुक्ती फक्त गट 'क' आणि गट 'ड'मधील कर्मचाऱ्यांच्या वारसांनाच लागू होती. त्यामुळे त्यांच्या मोठ्या भावाचा अर्ज फेटाळण्यात आला होता. २७ सप्टेंबर २०२१ रोजी राज्य सरकारने नवीन जीआर काढून १ जानेवारी २०२० पासून गट 'अ', गट 'ब'मधील कर्मचाऱ्यांच्या वारसांनाही हा लाभ लागू केला होता.

# राज्यात दुष्काळामुळे भाजीपाल्याचे दर दुप्पट

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नवी मुंबई** – राज्यात सध्या निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती, पावसाचा लपंडाव आणि अपुऱ्या पाण्यामुळे भाजीपाल्याचा पुरवठा कमी झाला आहे. पितृपक्षामुळे नैवेद्यासाठी लागणाऱ्या पालेभाज्या आणि फळभाज्यांच्या मागणीत अचानक वाढ झाली आहे, ज्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला मोठा फटका बसत आहे.

दुष्काळामुळे आवक घटल्याने आणि पितृपक्षाच्या मागणीमुळे किरकोळ बाजारात भाज्यांचे भाव वधारले आहेत. किरकोळ बाजारात पालक प्रति जुडी ४० रुपये तर मेथीच्या पानांची जुडी



३० रुपयांवर पोहोचली आहे. नैवेद्यासाठी आणि धार्मिक कार्यासाठी लागणाऱ्या फळभाज्यांच्या (टोमॅटो, भेंडी, गवार, कारले) किंमतीतही १५ ते २० टक्क्यांची वाढ झाली आहे.

पावसाची अनिश्चितता आणि दुष्काळ राज्याच्या बऱ्याच भागात पावसाने ओढ दिल्याने पिके करपली आहेत. उत्पादनात घट झाल्यामुळे एपीएमसी घाऊक बाजारात येणारी पालेभाज्या आणि फळभाज्यांची आवक अपुरी पडत आहे.वाढलेला इंधन खर्च आणि वाहतूक भाडे वाढल्याने घाऊक बाजारात माल महाग मिळत आहे. येत्या काही दिवसात पावसाची स्थिती किंवा बाजारातील पुरवठा सुधारला नाही, तर भाजीपाल्याचे वाढलेले दर असेच कायम राहण्याची किंवा त्यात आणखी भर पडण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

# शिक्षक नियुक्ती घोटाळा प्रकरणी मोठी अपडेट, २०१२ नंतरच्या शिक्षकांच्या नियुक्त्या संशयाच्या भोवऱ्यात

## नागपूर विभागातीत १३९७ शिक्षकांची फेरपडताळणी होणार

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**नागपूर** – शिक्षक नियुक्ती घोटाळ्यासंदर्भात एक मोठी अपडेट समोर आली आहे. शालार्थ आयडी घोटाळ्याच्या चौकशीचा तपास करत असतांना इतर ही काही शिक्षकांच्या नेमणुकांना घेऊन शालेय शिक्षण विभागाला संशय आला होता. अशातच आता एकट्या नागपूर विभागातीत १३९७ शिक्षकांच्या नियुक्तीची फेरपडताळणी केली जाणार असून पुढील आठवड्यात या फेरपडताळणीला सुरवात होणार असल्याची माहिती आहे. दरम्यान, २०१२ नंतर



अनेक शिक्षकांच्या नियुक्त्या या नियमबाह्य पद्धतीने केल्याचे शिक्षण विभागाला शालार्थ आयडी घोटाळ्याच्या चौकशी दरम्यान तपासात पुढे आले होते. त्यामुळे या १३९७ शिक्षकांना व्यक्तिशः सुनावणीला बोलावून त्यांची कागदपत्र, त्यांच्या निवडीची प्रक्रिया तपासली जाणार आहे.

दरम्यान, न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ही पडताळणी होणार असून जे शिक्षक या प्रकरणी दोषी आढळले त्यांच्या कारवाई केली जाईल, असे नागपूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शिवलिंग पटवे यांनी सांगितले. २०१२ पासून पूर्व विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये शिक्षक नियुक्त्यांची चौकशी शालार्थ आयडी घोटाळ्यानंतर आता २०१२ पासून पूर्व विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये झालेल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांचीही चौकशी करण्यात येत आहे.





